<u>मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना</u>
सुधारीत नियमावली

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : मोवाप्र-२०१६/प्र.क्र.१३५/शिक्षण-१
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ९ नोव्हेंबर, २०१७

<u>वाचा</u> :

(१) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र.ईबीसी-१९७०/१२१३९७/जे, दिनांक ७ सप्टेंबर, १९७२
(२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, क्र.ईबीसी-१०८२/६६३९६/६३५/मावक-२, दिनांक २१ मार्च, १९८९
(३) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.संकिर्ण-१०९५/प्र.क्र.५७/ मावक-२, दिनांक २६ जुलै, १९९५
(४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.मोवाप्र-२००५/प्र.क्र.१४/ मावक-२, दिनांक ४ फेब्रुवारी, २००८
(५) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.इबीसी-२०१२/प्र.क्र.३५/ शिक्षण-१, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१३
(६) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.मोवाप्र-२०१३/प्र.क्र.२९४/ शिक्षण-१, दिनांक २९जानेवारी,२०१६

<u>प्रस्तावना</u> :

राज्यातील वाहनांची वाढणारी संख्या, वाहतुक व्यवस्था, रस्ते व दिवसेंदिवस लोकांचा पर्यटनाकडे वाढणारा कल लक्षात घेता, वाहन व्यवसायामध्ये रोजगाराची मोठया प्रमाणात संधी निर्माण होत आहे. तथापि, मागासवर्गीय समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असून त्याबरोबरच बेरोजगारीचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व त्यांना कौशल्यपुर्ण प्रशिक्षण मिळावे, म्हणून सदरच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

मोटार वाहन प्रशिक्षण ही योजना राज्यात सन १९७२ पासून लागू करण्यात आलेली आहे. सदर योजनेंतर्गत प्रथमत: महाराष्ट्र राज्य महामार्ग परिवहन महामंडळ यांचेमार्फत मागासवर्गीय उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात येत होते. महामंडळामार्फत सुरु असणाऱ्या मोटार वाहन प्रशिक्षण योजनेस नवीन मोटार वाहन अधिनियम, १९८८ नुसार काही अडचणी उपस्थित केल्यामुळे उमेदवार प्रशिक्षित करणेबाबत असमर्थता व्यक्त केलेली होती. त्यामुळे मागासवर्गीय उमेदवार मोटार वाहन चालकाचे प्रशिक्षण घेण्यास वंचित होऊ नये, म्हणून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण योजनेप्रमाणेच प्रशिक्षण देण्यात यावे, म्हणून शासनाने संदर्भातील दिनांक २६ जुलै, १९९५ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत योजनेस मान्यता दिलेली होती.

सदर योजनेअंतर्गत दिनांक २६ फेब्रुवारी, २०१३ च्या शासन निर्णयानुसार निवड करण्यात आलेल्या मोटरवाहन प्रशिक्षण संस्थेसोबतचा करारनामा दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी

संपुष्टात आलेला असल्याने सदरचे प्रशिक्षण सन २०१५-१६ या वर्षापासून बंद होती. दरम्यान, या योजनेच्या सन २०१२-१३ च्या लेखापरीक्षण अहवालाच्या अनुषंगाने योजनेच्या निकषामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

सन २०१७-१८ या वर्षापासून पुढील आदेश होईपर्यंत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील उमेदवारांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजनेच्या सुधारीत नियमावलीस या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेच्या अटी व शर्ती, लाभार्थी निवडीचे निकष, अर्जाचा नमुना, बंधपत्र, करारनामा व इतर कागदपत्र इ. बाबी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-“अ”, “ब”, “क”, “ड” आणि “इ” प्रमाणे राहतील.

२. या योजनेवर होणारा खर्च, **(अ)** अनुसूचित जातीचे मुलां-मुलींसाठी मोटार वाहनचालक प्रशिक्षणावर होणारा खर्च, “२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, ००१-संचालन व प्रशासन, १०२-आर्थिक विकास राज्य योजनांतर्गत योजना, (०१)(०२) मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण (वि.घ.यो.)(राज्य) (२२२५-सी-९५६), ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर)” व **(ब)** अनुसूचित जातीचे मुलां-मुलींसाठी मोटार वाहनचालक प्रशिक्षणावर होणारा खर्च “२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण, ०१-अनुसूचित जातीचे कल्याण, १०२-आर्थिक विकास, (०३)(०७) मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण (वि.घ.यो.)(२२२५-३७०७), ३१-सहायक अनुदान (वेतनेत्तर)” या लेखाशिर्षाखाली टाकण्यात येऊन चालू वर्षातील मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. या साठी आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरहु शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१७११०९१६४४२३७१२२ आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dinesh Ramchandra Dingle

Digitally signed by Dinesh Ramchandra Dingle
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8612f2011cf8cde3b074d561cd711c17c6c3fd836467a8648a8d21dc84bc01be, cn=Dinesh Ramchandra Dingle
Date: 2017.11.10 13:13:40 +05'30'

(दि.रा.डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ, मुंबई
४) मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई
५) मा.मंत्री, सा.न्या.व वि.स.यांचे खाजगी सचिव
६) मा.राज्यमंत्री, सा.न्या.व वि.स.यांचे खाजगी सचिव
७) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे

८) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग
९) सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग
१०) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सर्व जिल्हा परिषद
११) व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., मुंबई
१२) व्यवस्थापकीय संचालक, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ मर्या., मुंबई
१३) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/विघयो), सा.न्या.व वि.स.वि., मंत्रालय, मुंबई.
१६) निवडनस्ती (का.शिक्षण-१)

परिशिष्ट-अ

(शासन निर्णय क्र.मोवाप्र-२०१६/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक ९ नोव्हेंबर,२०१७ चे सहपत्र)

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेरोजगार युवकांसाठी मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना नियमावली.

*****

(१) सदरची योजना राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येईल.

(२) केंद्र शासन, राज्य शासन व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळा मार्फत चालविण्यात येणाऱ्या वाहनचालक प्रशिक्षण संस्था, तसेच मोटार वाहन विभागाने प्राधिकृत केलेल्या प्रशिक्षण देणारी संस्था ही मोटार वाहन अधिनियमांतर्गत नमूद, सर्व मुलभूत सोयींनीयूक्त असावी.

(३) प्रशिक्षण हे केंद्रीय मोटर वाहन कायदा व त्या अंतर्गत करण्यात आलेले नियम, तसेच महाराष्ट्र मोटार वाहन कायदा व त्या अंतर्गत करण्यात आलेले नियम यामधील तरतूदी नुसार राहील.

(४) सदरील प्रशिक्षण हे खालील परवान्यासाठी राहील.

अ.क्र.	प्रशिक्षणाचा तपशिल	शैक्षणिक पात्रता	वयोमर्यादा	प्रशिक्षणाचा कालावधी	प्रशिक्षणाचे स्वरुप	इतर अटी
१	लाईट मोटार व्हेहीकल)LMV(नॉन ट्रान्सपोर्ट	किमान वी पास ८ चांगली दृष्टी असणे आवश्यक.	किमान वर्षे १८ पूर्ण	३० दिवस	निवासी व अनिवासी	----
२	हेवी मोटार व्हेहीकल)HMV(	किमान ८ वी पास चांगली दृष्टी असणे आवश्यक.	किमान वर्षे २० पूर्ण	दिवस ३०	निवासी व अनिवासी	किमान वर्ष १ LMV ट्रान्सपोर्ट लायसन्स धारण केलेले असावे.

(५) प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची निवड ई-निविदेव्दारे शासन स्तरावरुन करण्यात येईल. तथापी, प्रशिक्षण देणारी संस्था जर केंद्र व राज्य शासनामार्फत किंवा महामंडळा मार्फत चालविली जात असेल, तर त्यांनी नमूद केलेले दराबाबत वाटाघाटी करण्यात येतील. त्यानंतर अंतिम दर ठरविण्यात येईल.

(६) **अ) निवासी प्रशिक्षण-** प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रती विद्यार्थी निविदेमध्ये अंतिम केलेल्या दराप्रमाणे खर्चाची प्रतिपूर्ती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून करण्यात येईल. यामध्ये मोटार वाहन प्रशिक्षण, मोटार वाहन प्रात्यक्षिक, सिमूलेटर ट्रेनिंग, वर्कशॉप ट्रेनिंग, निवास, भोजन, वैद्यकीय चाचणी, कच्चे व पक्के लायसन्स, फोटो याबाबींचा समावेश राहील.

ब) अनिवासी प्रशिक्षण- प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेस प्रती विद्यार्थी निविदेमध्ये अंतिम केलेल्या दराप्रमाणे खर्चाची प्रतिपूर्ती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडून करण्यात येईल. यामध्ये मोटार वाहन प्रशिक्षण, मोटार वाहन प्रात्यक्षिक, सिमूलेटर ट्रेनिंग, वर्कशॉप ट्रेनिंग, वैद्यकीय चाचणी, कच्चे व पक्के लायसन्स, फोटो याबाबींचा समावेश राहील.

(७) निवासी उमेदवारास प्रशिक्षण कालावधीमध्ये मोटार वाहन प्रशिक्षण, मोटार वाहनाचे प्रात्यक्षिक, सिमुलेटर ट्रेनिंग, क्लासरुम ट्रेनिंग देणे बंधनकारक राहील. तसेच प्रशिक्षणार्थींची निवास, भोजनाची व्यवस्था करणे आवश्यक राहील.

(८) प्रत्येक उमेदवाराचा दैनिक हजेरीपट ठेवण्यात यावा.

(९) प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संस्थेने वाहन चालक परवाना मिळवून देणे बंधनकारक राहील.

(१०) यशस्वीरित्या प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांची यादी आवश्यक त्या माहितीसह विहीत नमुन्यात तयार करुन संबंधीत, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर १० दिवसांच्या आत सादर करावी.

(११) प्रशिक्षण कालावधीत अनिवासी प्रशिक्षणार्थीचा दैनंदिन खर्च भागविण्यासाठी रु.१,२००/- विद्यावेतन म्हणून देय राहील. सदरची रक्कम प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर व वाहन चालक परवाना प्राप्त झाल्यानंतर सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण हे प्रशिक्षणार्थीच्या बँक खात्यावर परस्पर वर्ग करतील.

(१२) प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी संबंधीत संस्था, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, तसेच संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी अद्यावत ठेवावी.

(१३) प्रशिक्षणासाठी क्षेत्रनिहाय नमूद केलेले भौतिक उद्दिष्टे शासन स्तरावरुन निश्चित करुन सर्व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना देण्यात येईल. त्यानुसार संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी लाभार्थी निवड समिती मार्फत प्रशिक्षणार्थींची निवड करणे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींची यादी संस्थेला उपलब्ध करुन देण्यात यावी.

(१४) निवड झालेल्या प्रशिक्षण संस्थेबरोबर सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी आवश्यक तो करारनामा करुन घ्यावा.

(१५) निवड करण्यात आलेल्या प्रशिक्षणार्थीकडून विहीत नमून्यातील बंधपत्र सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी करुन घ्यावे.

*****

परिशिष्ट-ब

(शासन निर्णय क्र.मोवाप्र-२०१६/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक ९नोव्हेंबर,२०१७चे सहपत्र)

मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना लाभार्थी निवडीचे निकष :-

(१) प्रशिक्षणार्थी हा महाराष्ट्र राज्याचा कायमस्वरुपी रहिवासी असावा.

(२) प्रशिक्षणार्थी हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील असावा.

(३) अर्जदाराचे वय जाहिरात प्रसिध्द केल्याच्या दिनांकास हलके वाहन चालक परवाना करीता वय १८ वर्षे पुर्ण, तर जड वाहन चालक परवाना करीता वय २० वर्षे पूर्ण असावे. वरील दोन्ही परवान्यांसाठी अर्जदाराची कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे राहील.

(४) ज्या उमेदवारास जड वाहन परवाना प्रशिक्षण घ्यावयाचे आहे, त्याचे कडे हलके मोटार वाहन परवाना (ट्रान्सपोर्ट) १ वर्षे पूर्ण झालेले असणे आवश्यक आहे.

(४) अर्जदार हा किमान इयत्ता ८ वी उत्तीर्ण व बेरोजगार असावा.

(५) अर्जदाराचे वास्तव्य हे संबंधीत जिल्ह्यातील असणे बंधनकारक आहे. त्यासाठी वास्तव्याच्या ठिकाणचे पालक /स्वत:च्या नावावरील रेशनकार्ड/विद्युत देयक/ आधारकार्ड इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

(६) अर्जदाराच्या वडिलांचे सर्व मार्गांनी मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाख पेक्षा जास्त नसावे. त्या पुष्टर्थ सक्षम प्राधिकारी (तहसिलदार) यांचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्यात यावा.

(७) अर्जदार हा अनुसूचित जाती व नवबौध्द घटक वर्गातील असल्याबाबत जातीचे विहीत प्रमाणपत्र दाखल करणे बंधनकारक राहील.

(८) एकूण उद्दिष्टांपैकी हलके मोटार वाहन प्रशिक्षणासाठी १०% जागा महिलांसाठी आरक्षित राहतील. तथापी, महिला प्रशिक्षणार्थींचे अर्ज कमी प्रमाणात प्राप्त झाल्यास रिक्त जागा पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

(९) प्रशिक्षणार्थी उमेदवार हे मोटार परिवहन अधिनियम तरतूदीनुसार शारिरीक व वैद्यकीयदृष्ट्या पात्र असावा.

(१०) अर्जदार यांनी यापूर्वी या योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

(११) अर्जदाराकडे हलके मोटार वाहन चालक परवाना (license) असल्यास, असे अर्जदार या योजनेत जड वाहन परवान्याखेरीज लाभ घेण्यास पात्र राहणार नाहीत.

(१२) लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी खालील प्रमाणे समितीचे गठन करण्यात येत आहे.

१) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण (संबंधीत) -अध्यक्ष

२) मोटार वाहन निरिक्षक, प्रादेशिक /जिल्हा परिवहन कार्यालय - सदस्य

३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (संबंधीत) - सदस्य सचिव

(१३) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांनी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रसिध्दीस, देऊन इच्छूक उमेदवारांचे विहीत नमून्यात अर्ज मागवावेत. प्राप्त अर्जांची दिनांक निहाय विहीत नमुन्यातील वहीमध्ये नोंद करण्यात यावी. त्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

अ) प्राप्त झालेल्या अर्जांची कार्यालय स्तरावर छानणी करण्यात यावी व पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात यावी.

ब) शासनाकडून जिल्हानिहाय उद्दिष्टे प्राप्त झाल्यानंतर, त्यानुसार पात्र लाभार्थ्यांमधून प्रशिक्षणासाठी लाभार्थ्यांची निवड लॉटरी पध्दतीने करुन त्याची यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात यावी. व सदरची यादी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेमार्फत संबंधीत प्रशिक्षण संस्थेस देण्यात यावी.

क) संबंधीत प्रशिक्षण संस्थेने निवड यादी प्राप्त झाल्यानंतर प्रशिक्षणासाठी हजर राहणेसाठी लाभार्थ्यांना हस्ते पोहच देय डाकेने कळविण्यात यावे. तसेच त्याच्या भ्रमणध्वनीवर एसएमएस वर कळविण्यात यावे.

ड) प्रशिक्षण सत्रासाठी हजर झालेल्या लाभार्थ्याकडून आवश्यक ते बंधपत्र रु. १००/- चे स्टँप पेपरवर करुन घेणे, तसेच इतर अटींची पुर्तता करुन घेण्यात यावी.

इ) संबंधीत संस्थेने निवड यादीतील लाभार्थ्यांची प्रथमत: वैद्यकीय तपासणी जिल्हा सामान्य रुग्ण्यालय / ग्रामीण रुग्णालय, महानगरपालिका व नगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये करण्यात यावी व त्यामध्ये वैद्यकीयदृष्ट्या पात्र ठरणाऱ्या उमेदवारांनाच प्रशिक्षण सत्रासाठी रुजू करुन घ्यावे.

(ई) निवड समितीने तयार केलेली निवड यादी व प्रतिक्षा यादी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचे स्वाक्षरीने संबंधीत संस्थेस देण्यात यावी. निवड यादीतील उमेदवार विहीत मुदतीत हजर न झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना अनुक्रमांकानुसार प्रशिक्षणासाठी बोलविण्यात यावे.

(१४) अर्जदाराची प्रशिक्षणासाठी निवड झाल्यानंतर मध्येच प्रशिक्षण सोडता येणार नाही, तसे केल्यास झालेला खर्च उमेदवारांकडून वसूलपात्र राहील. व तसे बंधपत्र प्रशिक्षणार्थींकडून घेणे बंधनकारक राहील.

परिशिष्ट-क

(शासन निर्णय क्र.मोवाप्र-२०१६/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक ९नोव्हेंबर,२०१७चे सहपत्र)

उमेदवाराकडून भरुन घ्यावयाचा अर्जाचा विहित नमुना

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील बेरोजगार युवकांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना

प्रति, मा.सहाय्यक आयुक्त,. समाज कल्याण....................................		उमेदवाराचा पासपोर्ट साईजचा रंगीत फोटो
१.	उमेदवाराचे संपूर्ण नांव	:श्री/श्रीमती--
२.	उमेदवाराचा भ्रमणध्वनी क्रमांक	--:------------
३.	उमेदवाराचा ई-मेल आयडी	--:-----------
४.	उमेदवाराचा आधार कार्ड क्रमांक	--
५.	उमेदवाराचे लिंग	: पुरुष / स्त्री
६.	उमेदवाराची जात	--:-----------
७.	उमेदवाराच्या जातीचा प्रवर्ग	: अनुसूचित जाती / नवबौध्द
८.	उमेदवाराच्या जाती प्रमाणपत्राचा तपशिल.	: जातीचा प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम : उपविभागीय अधिकारी--------------------------------- जिल्हा :-- प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक--
९.	उमेदवाराची जन्मतारीख	/ / :

१०.	जाहिरात दिनांकास असलेले वय	वर्ष--
११.	उमेदवाराचा संपूर्ण पत्ता :	--: --- जिल्हा-- पिनकोड--
१२.	उमेदवाराची शैक्षणिक पात्रता :	८ वी / १० वी / १२ वी/ पदविका/पदवी/पदव्युत्तर तपशिल--
१३.	उमेदवाराच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम	:रु.--
१४.	उत्पन्नाच्या दाखल्याचा तपशिल	: दाखला देणाऱ्या अधिकाऱ्याचे पदनाम- तहसिलदार-- जिल्हा-- दाखल्याचा क्रमांक व दिनांक--
१५.	उमेदवाराची उंची	: फुट ------------ इंच---------------------
१६.	उमेदवाराचे वजन	: कि.ग्रॅ.--------------------------------------
१७.	उमेदवाराच्या बँक खात्याचा तपशिल	: बॅंकेचे नांव :------------------------------ शाखा:------------------------------------- खाते क्रमांक------------------------------ आयएफएससी कोड---------------------

१८.	यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला आहे किंवा कसे?	: होय / नाही
१९.	अर्जासोबत पुढील प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडव्यात.	
	(१) **उमेदवाराचा शाळा सोडल्याचा दाखला**	: होय / नाही
	(२)**उमेदवाराचे आधार कार्ड**	: होय / नाही
	(३) **उमेदवाराचे जातीचे प्रमाणपत्र**	: होय / नाही
	(४) **उत्पन्नाचा दाखला**	: होय / नाही
	(५) **रेशन कार्ड**	: होय / नाही
	(६) **उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो**	: होय /नाही

१) अर्जात नमूद केलेली माहिती ही माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. त्यामध्ये चुक आढळल्यास त्यास मी जबाबदार राहील.

२) मी असे नमूद करतो की, मी एक बेरोजगार तरुण असून माझ्याकडे वाहनचालकाचा परवाना नाही, तसेच मी अन्य कोणत्याही ठिकाणी नोकरी करत नाही.

३) प्रशिक्षणासाठी माझी निवड झाल्यास, मी प्रशिक्षण अर्धवट सोडणार नाही, व त्यापोटी झालेला खर्च माझ्याकडून वसूलपात्र राहील, तसे मी रु. १००/- चे स्टँप पेपरवर बंधपत्र देईन.

ठिकाण : **उमेदवाराचे नांव व स्वाक्षरी**

दिनांक : / /२०

परिशिष्ट-ड

(शासन निर्णय क्र.मोवाप्र-२०१६/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक ९नोव्हेंबर,२०१७चे सहपत्र)

करारनामा

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील बेरोजगार युवकांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेरोजगार युवकांना स्वयंरोजगार /व्यवसायाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, तसेच त्यांना तांत्रिक कौशल्य प्राप्त व्हावे या उद्देशाने शासनाने मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना सुरु केलेली आहे. प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या लाभार्थ्यांना वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी निवड केलेल्या संस्थेबरोबर करावयाचा करारनामा :

(श्री.--------------------)
आयुक्त, समाज कल्याण — लिहून घेणार
महाराष्ट्र राज्य, पुणे

श्री.----------------------
------------------------- — लिहून देणार

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील युवकांनी स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हावी, म्हणून मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना शासनाने सुरु केलेली असून शासनाचे आदेश क्र.--------------- दिनांक / /२० प्रमाणे प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी आमच्या संस्थेची निवड करण्यात आली आहे. म्हणून खालील प्रमाणे करारनामा करण्यात येत आहे.

<u>अटी व शर्ती :</u>

१) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेरोजगार युवकांना मोटार वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी आमच्या संस्थेवर दिलेली असून योजनेच्या अटी व शर्ती लिहून देणार यांना मान्य आहे.

२) कार्यारंभ आदेश प्राप्त होताच प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करण्यात येईल, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

३) कार्यारंभ आदेश मिळाल्यानंतर व करारनामा झाल्यानंतर योजनेच्या प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करणे आवश्यक राहील, अन्यथा दंडाची रक्कम प्रतिमहा रुपये १०,०००/- या प्रमाणे आकारण्यात येईल, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

४) योजनेच्या सर्व अटी व शर्ती मान्य असून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (संबंधीत) यांचेकडून यादी प्राप्त होताच प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु करणे, लिहून देणार यांना मान्य आहे.

५) प्रशिक्षणार्थींची वैद्यकीय तपासणी निर्देशित प्राधिकाऱ्याकडूनच करुन घेणे, वाहन चालविण्याचे कच्चे व पक्के परवाने (Licence) प्राप्त करुन देणे, ३० दिवसांचे मोटार वाहन चालकाचे प्रशिक्षण देण्याची जाबाबदारी संस्थेची राहील, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

६) प्रशिक्षणार्थींची हजेरी ठेवणे संस्थेवर बंधनकारक राहील, तसेच प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण दिल्यानंतर यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांची यादी, परवाना क्रमांक व दिनांक यांची अद्यावत यादी प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग (संबंधीत) व सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (संबंधीत) यांना सादर करणे बंधनकारक राहील, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

७) प्रशिक्षण कार्यक्रम सुरु करण्यासाठी कोणतेही अग्रीम देण्यात येणार नाही, तसेच प्रशिक्षण सत्र संपल्यानंतर लाभार्थ्यांची यादी, परवाना प्रत इत्यादी बाबींची पुर्तता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांचेकडे केल्यानंतर कार्यारंभ आदेशातील अटी व शर्तीनुसार देयके अदा करण्यात येतील, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

८) कार्यारंभ आदेशाच्या अनुषंगाने वाहन चालक प्रशिक्षण संस्था व शासन यांच्यामध्ये काही वाद निर्माण झाल्यास "आरबीट्रेशन ॲन्ड कॉन्सीलेशन ॲक्ट १९९६" नुसार प्रकरण/वाद लवादाकडे निर्णयार्थ पाठविले जाईल. आणि याबाबत लवादाने दिलेला निकाल हा अंतिम व बंधनकारक राहील, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

९) आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे / प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, / सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अथवा त्यांचे प्रतिनिधी प्रशिक्षण कार्यक्रमाची अचानक तपासणी करतील, त्यावेळेस प्रशिक्षणातील त्रृटी निदर्शनास आणू शकतात, अशा त्रृटी निदर्शनास आल्यास आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे त्याबाबत योग्य वाटेल त्या दराने दंड सुनिश्चित करतील, सदर दंड देय असणाऱ्या देयकातून कपात करण्यात येईल, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

१०) कोणतेही कारण न देता, प्रशिक्षण बंद करणे, प्रशिक्षणाचे कार्यारंभ आदेश रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना राहतील, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

११) देयक अदा करताना नियमानुसार आयकर व इतर संविधानिक कर कपात करण्यात येईल, हे लिहून देणार यांना मान्य आहे.

१२) कार्यारंभ आदेशात नमूद केल्याप्रमाणे प्रती प्रशिक्षणार्थी रक्कम रुपये -------------/- व्यतीरिक्त कोणत्याही प्रकारच्या रक्कमेची मागणी करता येणार नाही. किंवा त्यासाठी न्यायालयात दाद मागता येणार नाही. हे लिहून देणार यांना मान्य आहे.

१३) मोटार वाहन चालक प्रशिक्षणासाठी लिहून देणार यांचे संस्थेची निवड झालेली असून त्यापोटी रुपये ५ लाख इतकी अनामत रक्कम विभागाकडे जमा करणे बंधनकारक असून प्रशिक्षण सुरु करण्यापूर्वी सदरची रक्कम रेखांकित डिमांड ड्राप्ट /बँक गॅरंटीव्दारे लिहून घेणार यांचेकडे जमा करणे बंधनकारक राहील. प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर/ यशस्वी केल्यानंतर सदरची अनामत रक्कम लिहून घेणार हे लिहून देणार यांना परत करतील, हे लिहून देणार यांना मान्य आहे. सदरील अट शासकीय संस्थांना लागू राहणार नाही.

वरील करारनाम्यात नमुद करण्यात आलेले सर्व अटी व शर्ती, तसेच कार्यारंभ आदेश मी वाचलेले असून करारनाम्यात नमुद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून स्वखुशीने मी हा करारनामा कोणतेही नशापान न करता, कोणाच्याही दबावाखाली न येता, आज दिनांक / /२०१७ रोजी ---------- या ठिकाणी लिहून देत आहे.

ठिकाण : ---------

दिनांक / /

श्री.----------------------

(लिहून देणार)

(श्री.--------------------)

आयुक्त, समाज कल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे
(लिहून घेणार)

साक्षीदार

१) -----------------------------------
----

२) ----------------------------------

परिशिष्ट-इ

(शासन निर्णय क्र.मोवाप्र-२०१६/प्र.क्र.१३५/शिक्षण-१, दिनांक ९नोव्हेंबर,२०१७चे सहपत्र)

प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या प्रशिक्षणार्थीकडून घ्यावयाचे बंधपत्र नुमुना

(रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर)

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील बेरोजगार युवकांना मोटार वाहन चालक प्रशिक्षण योजना

मी श्री/श्रीमती/कुमारी-- ----वय वर्षे------------------- मु.पो.----------------------तालुका---------- --------------शहर-------------------जिल्हा------------------- सत्य प्रतिज्ञेवर बंधपत्र लिहून देतो / देते की, सामाजिक न्याय विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या "अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेरोजगार युवकांसाठी मोटार वाहन चालक प्रशिक्षण " या योजनेंतर्गत वाहन चालक प्रशिक्षणासाठी मी अर्ज केलेला होता. त्यानुसार सदरचे प्रशिक्षणासाठी माझी निवड करण्यात आलेली असून खालील अटी व शर्ती मला मान्य असल्याबाबत बंधपत्र करुन देत आहे.

१) प्रशिक्षणासाठी माझी निवड झालेली असून अटी व शर्तीमध्ये नमूद केल्याप्रमाणे मी सध्या बेरोजगार असून कोणत्याही शासकीय / खाजगी कार्यालये पूर्णवेळ नोकरी करत नाही.

२) जड मोटार वाहन चालक प्रशिक्षणासाठी आवश्यक ती आर्हता माझ्याकडे आहे.

३) सदरचे प्रशिक्षणाचा कालावधी हा ३० दिवसांचा असल्याचे मला ज्ञान असून सदरचे कालावधीत मी प्रशिक्षणासाठी गैरहजर राहणार नाही अथवा मध्येच प्रशिक्षण सोडून जाणार नाही, हे मला मान्य आहे. तसेच प्रशिक्षण मध्येच सोडून गेल्यास संपूर्ण प्रशिक्षण कालावधीचा खर्च माझ्याकडून वसूलपात्र राहील.

४) प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मी स्वयंरोजगार सुरु केल्यास अथवा शासकीय, निमशासकीय व खाजगी संस्थेमध्ये मला नोकरी मिळाल्यास त्याची माहिती संबंधीत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांना देणे माझ्यावर बंधनकारक राहील.

वरील प्रमाणे अटी व शर्ती मला मान्य असल्याने सदरचे बंधपत्र मी स्वखुशीने लिहून देत असून बंधपत्रातील अटी व शर्तीचे गांभिर्य मला ज्ञात आहे.

दिनांक : / /२०

ठिकाण : ---------------- सही :-----------------------------

नांव :-----------------------------

पत्ता :-----------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक------------------

सहाय्यक आयुक्त,

समाज कल्याण----------------